# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१९

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**राज्यातील अनधिकृत रुग्णालये व बोगस डॉक्टरांवर कारवाई करण्याबाबत**

**(१) १७९८८ (३१-०७-२०१५). डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.जीवा गावित (कळवण), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.हरीभाऊ जावळे (रावेर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.काशिराम पावरा (शिरपूर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या क्षेत्रातील मिरा रोड, भाईंदर तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रातील मालवणी, धारावी आणि विक्रोळी या परिसरात बोगस डॉक्टर व्यवसाय करत असून चेंबूर, गोंवडी व मानखुर्द या परिसरात सुमारे ३७ बोगस रुग्णालये व नर्सिंग होम चालविण्यात येत असल्याची बाब माहिती अधिकारांतर्गत प्राप्त झालेल्या माहितीवरुन माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने मुंबईत आतापर्यंत किती अनधिकृत रुग्णालये व बोगस डॉक्टरांवर कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१४-०३-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे,

मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये २०१५ व त्या सुमारास बोगस डॉक्टर असल्याचे निदर्शनास आलेले नसून यापूर्वी आढळलेल्या बोगस डॉक्टर्स वर खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रात मालवणी, धारावी आणि विक्रोळी या परिसरात सर्वेक्षणांतर्गत ५ बोगस डॉक्टर व्यवसाय करतांना आढळले तसेच चेंबुर, गोवंडी व मानखुर्द परिसरात एकूण ३३ अनधिकृत रुग्णालय व नर्सिंग होम चालविण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागाने वेळोवेळी केलेल्या चौकशीअंती बोगस डॉक्टर्स व अनधिकृत रुग्णालये यांच्यावर खालीलप्रमाणे कारवाई केलेली आहे.

| वर्ष | केलेली कारवाई |
|---|---|
| २०१० | ४ बोगस वैद्यकीय व्यवसायिकांना अटक करुन २५ दवाखाने सिल करण्यात आले. |
| २०१३ | ३ बोगस वैद्यकीय व्यवसायीकांवर कारवाई केली. त्यापैकी २ बोगस डॉक्टर्स फरार व १ बोगस डॉक्टरला अटक करण्यात आली. |
| २०१४ | १३ रुग्णालयांची नोंदणी रद्द करण्यात आली. |

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील हृदयरोगी रुग्णांना दान केलेले हृदय तातडीने पोहोचविण्यासाठी राज्य शासनाने हेलिकॉप्टरची सेवा देणा-या कंपन्यांशी केलेला सामंजस्य करार

**(२) ५२२२६ (०३-०५-२०१६). श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील हृदयरोगी रुग्णांना एखादा अवयव दान करणा-या व्यक्तीने आपले हृदय दान केल्यास व ती दान देणारी व्यक्ती शेजारच्या गुजरात अथवा शेजारील राज्यातील असल्यास सदर दान केलेले हृदय व हृदयदान करणा-या व्यक्तींना मुंबईच्या संबंधित रुग्णालयांमध्ये तातडीने आणण्यासाठी राज्य शासनाने हेलिकॉप्टरची सेवा देणा-या कंपन्यांबरोबर सामंजस्य करार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, असा अत्यंत खर्चिक करार करण्याची काही विशेष कारणे आहेत काय, असल्यास, सदर कारणे कोणती,

(३) असल्यास, एखादया रोग्याचे हृदय निकामी झाल्यास त्याला हृदयदान करणा-या व्यक्तींच्या हृदयाची शस्त्रक्रियाही अत्यंत महागडी असताना व गुजरात येथील हृदयदान केलेल्या व्यक्तीचे हृदय अथवा सदर दान करण्या-या व्यक्तींना हेलीकॉप्टरच्या सेवेने तातडीने मुंबईला आणण्यासाठी सुमारे ७ ते १० लाख रुपये खर्च येणार असल्याने अशा खर्चातील काही रक्कम राज्यशासन देणार आहे काय ?

**श्री. गिरीष महाजन (१४-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) अशा प्रकारचा कोणताही निर्णय अद्याप झालेला नाही.

---

**अभोणा (ता.कळवण, जि.नाशिक) येथील ग्रामीण रुग्णालयाच्या परिसरात रुग्णांची होत असलेली गैरसोय**

**(३) ५७७५७ (३०-०८-२०१६). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अभोणा (ता.कळवण, जि.नाशिक) येथील ग्रामीण रुग्णालयाच्या परिसरातील सांडपाण्याची विल्हेवाट लावण्याची कोणतीच व्यवस्था नसल्याने तेथे डुकरांचा मुक्तसंचार सुरु असून परिसरात अस्वच्छता पसरल्याने रुग्णांचे आरोग्य धोक्यात आल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रुग्णालयात परिसरातील आदिवासी भागातील अनेक रुग्ण उपचारासाठी येतात, मात्र सोयीसुविधांचा अभाव असल्याने व पिण्याच्या पाण्याची सोय नसल्याने रुग्णांची गैरसोय होत असल्याने अभोणा रुग्णालयातील समस्या त्वरित सोडविण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक १५ एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास वैद्यकिय अधीक्षक यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आदिवासी भागातील रुग्णांना सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०३-२०१९) :** (१) अंश:त खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि. ०४.०७.२०१६ रोजी वैद्यकीय अधिक्षक, ग्रामीण रूग्णालय, कळवण यांना लेखी निवेदन दिले आहे.

(३) रूग्णांच्या आरोग्याच्या दृष्टीने ड्रेनेज लाईनची दुरूस्ती करण्यात आली आहे. तसेच ग्रामीण रूग्णालयाच्या मुख्य प्रवेशद्वारावर कॅटलगार्ड बसविण्याबाबत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, कळवण यांच्याकडे सतत पाठपुरावा करण्यात येत आहे. तसेच रूग्णालयात दाखल होणारे रूग्ण व त्यांचे नातेवाईक यांच्या पिण्याच्या पाण्याच्या सोईकरीता रूग्णालयाच्या कक्षात ॲक्वागार्ड फ़िल्टर बसविण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहरातील इनलॅक्स बुधराणी रुग्णालयातील वैद्यकीय तज्ञांनी किडनीच्या आजारावरील रुग्णास चुकीचे औषध दिल्याबाबत**

**(४) ६७३२७ (१६-१२-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील इनलॅक्स बुधराणी रुग्णालयातील वैद्यकीय तज्ञांनी किडनीच्या आजारावरील रुग्णास चुकीचे औषध दिल्याने रुग्ण दगावल्याची घटना दिनांक ३ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णाच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याच्या आरोपावरून इनलॅक्स बुधराणी रुग्णालयाचे व्यवस्थापन आणि वैद्यकीय तज्ञांसह दोन परिचारिका विरुद्ध गुन्हा ही दाखल झाला आहे काय, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त घटना ही गंभीर स्वरुपाची असून या घटनेसह शहरात बोगस वैद्यकीय तज्ञ मोठ्या रुग्णालयांत कार्यरत असल्याचे ही निदर्शनास येत असल्याने या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१४-०३-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

सदर रुग्णालयात दि. २९.०७.२०१६ ते २७.०८.२०१६ दरम्यान श्री. चंद्रकांत वाळके किडनीच्या आजारासाठी ॲडमिट होते. त्यांना डॉ. सचिन पाटील व हॉस्पीटल स्टाफ नर्स शारदा हुंबरे व माधवी चक्रनारायण यांनी दुसऱ्या पेशंटची औषधे दिली. ती चुकीची औषधे सेवन केल्याने श्री. वाळके मयत झाले आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

डॉ.सचिन पाटील व हॉस्पीटल स्टाफ नर्स शारदा हुंबरे व माधवी चक्रनारायण यांच्याविरुध्द कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन येथे गु.रं.क्र. ८४/२०१६, भा.द.वि. ३०४(अ), ३४ प्रमाणे दि.०१.०९.२०१६ रोजी गुन्हा दाखल केला आहे.

(३) बोगस वैद्यकीय व्यवसायिकांवर आळा घालण्याकरिता पुढील शासन निर्णय/ परिपत्रके वेळोवेळी निर्गमित करण्यात आली आहेत.

अ) शासन निर्णय क्र.सीआयएम १०९१/सीआर-१७२/९१/एमईडी-८,दि.५ सप्टेंबर,१९९१,

ब) शासन परिपत्रक क्र.सीआयएम-१०९९/१७२६/प्र.क्र.३५५/९९/अधिनियम, दि.५.०२.२००३.

क) शासन निर्णय क्रमांक-सीआयएम १०९९/प्र.क्र.३५५/९९ अधिनियम, दि.७ फेब्रुवारी, २०००

ड) शासन निर्णय क्र. सीआयएम १०९९/प्र.क्र.३५५/९९ अधिनियम दि. ५ डिसेंबर, २००१.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### इगतपूरी (जि.नाशिक) येथील घोटी ग्रामीण रुग्णालयातील कारभाराबाबत

**(५) ६७७७१ (१०-०१-२०१७). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इगतपूरी (जि.नाशिक) येथील घोटी ग्रामीण रुग्णालयात ग्रामीण भागातून येणाऱ्या गोरगरीब रुग्णांची आर्थिक अडवणूक होत असल्याने रुग्ण तेथील वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कारभाराला त्रस्त झाले असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या धोरणानुसार बीपीएल धारकांची तपासणी विनामुल्य करण्यात यावी, असे निर्देश असताना येथील प्रयोगशाळे तज्ञ व एक्स रे कोणतीही पावती न देता शुल्क आकारीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्यासह येथे रुग्णांना चांगली वागणूक मिळावी यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

ग्रामीण रूग्णालय, घोटी येथील प्रयोगशाळा व क्ष-किरण विभागामध्ये होणा-या चाचणीचे शुल्क शासकीय दराने आकारले जाते व त्याची नोंद नोंदवहीत घेतली जाते. त्यानुसार सदर कक्षात प्रत्येक दिवसातील एकूण रूग्णांकडून आकारलेल्या शुल्काची एकत्रित शासकीय पावती देऊन सदर रक्कम स्वीय प्रपंजी खात्यात जमा केली जाते. तसेच बीपीएल धारकांना मोफ़त सेवा पुरविल्या जातात.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धुळे शहरातील जिल्हा रुग्णालय मेडिकलचे कॉलेजचे रुग्णालय विभाजित झाल्यापासून पूर्णपणे बंद पडल्याबाबत

**(६) ६८६९१ (१०-०१-२०१७). श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेले जिल्हा रुग्णालय वैद्यकीय महाविद्यालयाचे रुग्णालय विभाजित झाल्यापासून पूर्णपणे बंद असल्याचे दिनांक ११ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालय धुळे शहरापासून सात किलोमीटर लांब असून या ठिकाणी रुग्णांना जाण्या-येण्याचा त्रास होतो याकारणास्तव धुळे शहरातील रुग्णालयात दोनशे खाटांचे रुग्णालय सुरु करण्यासाठी शासकीय मंजुरी असूनही या कामात विलंब होत असल्याने रुग्णांची गैरसोय होत आहे हे लक्षात घेता याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०३-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) जिल्हा रूग्णालय, धुळे ची जुनी इमारत सद्यस्थितीत अधिष्ठाता श्री.भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालये यांच्या ताब्यात आहे. सद्यस्थितीत जिल्हा रूग्णालय, धुळे येथे बाह्य रूग्ण विभाग व २० खाटांचे आंतर रूग्ण विभाग सुरू करण्यात

आला आहे. सदर इमारतीच्या स्ट्रक्चरल ऑडिट नुसार दुरूस्ती अंदाजपत्रक व आराखड्यांना रू.२,०५,९३,६२१/- एवढ्या अनुदानास दि.२६.०२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मंजूरी देण्यात आली आहे. तसेच दि.१०.०५.२०१८ च्या शासन निर्णयान्वये विद्युत विभागाच्या दुरूस्ती नकाशे व अंदाजपत्रकास रू.९५,४२,४९६/- इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर इमारतीच्या दुरूस्तीचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नाशिक जिल्हा रुग्णालयाच्या आवारात रुग्णांच्या सुरक्षे संदर्भात

**(७) ७०७९४ (१०-०१-२०१७). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हा रुग्णालयाच्या आवारात राजरोजपणे मद्यपी देशी दारुचे सेवन व गुटखा खात असल्याचे दिनांक २६ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकारामुळे रूग्णालयाच्या सुरक्षततेचा प्रश्न निर्माण झाल्याने रूग्णामध्ये कमालीचा असंतोष पसरला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व या अनुषंगाने शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) जिल्हा रूग्णालय, नाशिक च्या सुरक्षेकरीता एकूण १४ सुरक्षा रक्षक नियुक्त करण्यात आले असून त्यांच्यामार्फत २४ तास सुरक्षा पुरविली जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अवयवदानासंदर्भात जनजागृतीसाठी राज्य शासनातर्फे अवयवदान जागृती महाअभियान राबविण्यात आल्याबाबत

**(८) ७१३२७ (१०-०१-२०१७). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अवयवदानासंदर्भात जनजागृतीसाठी राज्य शासनातर्फे अवयवदान जागृती महाअभियान दिनांक ३० ऑगस्ट ते १ सप्टेंबर, २०१६ या कालावधीत राबविण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महाअभियाना दरम्यान एकूण किती इच्छुक दात्यांची नोंदणी करण्यात आली,

(३) असल्यास, यामध्ये मृत्यूपश्चात देहदान करणारे दाते व मस्तिष्क मृत (ब्रेनडेड) झाल्यास अवयवदान करणारे दाते यांची संख्या किती आहे,
(४) असल्यास, अवयवदान अभियानाचा अधिक परिणामकारक करण्याच्यादृष्टीने शासनातर्फे कोणत्या प्रकारचे नियोजन आखण्यात आले वा येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (१४-०३-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) सदर महाअभियाना दरम्यान एकूण ३१९ इच्छुक दात्यांची नोंदणी करण्यात आली.
(३) मृत्यूपश्चात देहदान करणारे दाते निरंक व ब्रेनडेड झाल्यास अवयवदान करणारे दाते-१
(४) मानवी अवयव प्रत्यारोपणाकरिता रुग्णालयांना जास्तीत जास्त अवयवदाता तसेच मस्तिष्क मृत व्यक्तीचे अवयवदान कार्यक्रमास चालना देण्याकरिता उपसंचालक आरोग्य, जिल्हा आरोग्य अधिकारी यांना त्यांच्या स्तरावरुन जिल्हा शासकीय रुग्णालये, ग्रामीण शासकीय रुग्णालयामध्ये विविध शिबीरांचे आयोजन करुन अवयवदात्यांना आकर्षित करण्या हेतूने कार्यक्रमाचे आयोजन करणे, जिल्हा स्तरावर/ तालुका स्तरावर शुभारंभ व अवयवदान जागृती महारॅलीचे आयोजन करणे, अवयव नोंदणी कार्यक्रम निमंत्रणे घरोघर जाऊन वाटप करणे, जिल्हा स्तरावर/तालुका स्तरावर कार्यशाळा चर्चासत्र, चित्रकला, निबंध स्पर्धा यांचे आयोजन करणे, अवयवदान नोंदणी केलेल्या अवयवदात्यांचा सन्मान करणेबाबत सुचना देण्यात आल्या आहेत.

---

**अकोले (जि.अहमदनगर) तालुक्यातील ग्रामीण जिल्हा रुग्णालयाचे रुपांतर उपजिल्हा रुग्णालयात करण्याच्या मागणीबाबत**

**(९) ७८२१२ (१८-०४-२०१७). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोले (जि.अहमदनगर) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयाचे रुपांतर उपजिल्हा रुग्णालयात करण्याची मागणी मा.मुख्यमंत्री, मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री तसेच जिल्हा शल्यचिकित्सक, अहमदनगर यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक१५ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तालुक्यातील आदिवासी रुग्णांची मोठी असलेली संख्या विचारात घेता अकोले येथील ग्रामीण रुग्णालयाचे रुपांतर उपजिल्हा रुग्णालयात करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०३-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) सन २०११ च्या जनगणनेवर आधारीत नवीन आरोग्य संस्थांचा व कार्यान्वित रूग्णालयांचे श्रेणीवर्धन करण्यासाठी जोड बृहत आराखडा तयार करण्यात येत असून अकोला येथील

ग्रामीण रूग्णालयाचे श्रेणीवर्धन उपजिल्हा रूग्णालयामध्ये करण्याबाबतची मागणी जोड-बृहत आराखड्यामध्ये निकषानुसार समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली जिल्हयातील सिव्हील हॉस्पिटलमध्ये रुग्णांची होत असलेली गैरसोय**

**(१०) ८१६२१ (१८-०४-२०१७). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्हयातील सिव्हील हॉस्पिटलमध्ये रुग्णांची गैरसोय होत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दक्षिण महाराष्ट्रासह कर्नाटक राज्यातूनही सिव्हिल रुग्णालयांमध्ये मोठ्या प्रमाणात रुग्ण उपचारासाठी दाखल होत असून दररोज रुग्णालयात शेकडो रुग्ण उपचार घेत आहेत परंतु रुग्णालयातील कर्मचाऱ्यांकडून योग्य वागणूक रुग्णांच्या नातेवाईकांना मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, तदनुसार यास जबाबदार असणा-या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१६-०३-२०१९) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) लागू नाही.

---

**राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात प्राथमिक व नागरी सुविधांचा अभाव असल्याबाबत.**

**(११) ८५००१ (१९-०८-२०१७). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नंदूरबार जिल्हयातील आदिवासी भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रात वर्षानुवर्षे काम करणाऱ्या डॉक्टर्ससाठी राहण्याची सुविधा नसल्याने ते कुडाच्या घरांमध्ये राहतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्राथमिक आरोग्य केंद्रात वीज, शौचालय व औषधांची कमतरता असल्याने प्राथमिक केंद्रातील डॉक्टर्स, परिचारिका व अन्य कर्मचाऱ्याना सुविधेअभावी उपचार करण्यास विलंब लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार राज्यातील सर्वच प्राथमिक आरोग्य केंद्रात मुलभूत व नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०३-२०१९) :** (१) हे खरे आहे.

अक्कलकुव्वा तालुक्यातील मांडवा व जांगठी येथील प्राथमिक आरोग्य केंद्र यांना स्वत:च्या इमारती नसल्याने वैद्यकीय अधिका-यांना कुडाच्या घरात रहावे लागत आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र मांडवा व जांगठी, ता.अक्कलकुवा तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र रोषमाळ, बिलगांव व झापी, ता. धडगांव येथे विद्युत वितरण कंपन्यामार्फत विद्युत पुरवठा झालेला नसल्याने सदर ठिकाणी सोलर दिव्यांचा वापर करण्यात येत आहेत. सदर प्राथमिक आरोग्य केंद्रांत पुरेसा औषधसाठा उपलब्ध असून नागरीकांना आरोग्य सेवांचा लाभ देण्यात येत आहे.
(३) डॉक्टर, परिचारीका व अन्य कर्मचारी यांना सोयी सुविधा व नागरीकांना आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्राचे आणि कर्मचारी वसाहतींचे बांधकाम हाती घेण्याबाबत व प्राथमिक आरोग्य केंद्रात मूलभूत आणि नागरी सुविधा पुरविण्यासाठी संबंधित जिल्हा परिषदांकडून निधीच्या उपलब्धतेनुसार कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### धुळे शहरातील जुने जिल्हा रुग्णालयातील गैरप्रकाराबाबत

**(१२) ८५२६० (१९-०८-२०१७). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे शहराच्या मध्यवर्ती भागात असलेले जुने जिल्हा रुग्णालयात मद्यपीचा वावर व अनेक अनैतिक प्रकार सुरु असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन या इमारतीची देखभाल आणि सुरक्षा ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही.

अशा स्वरूपाची एकही लेखी वा तोंडी तक्रार जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयाकडे प्राप्त झालेली नाही.

(२) सद्यस्थितीत ४ सुरक्षा रक्षकांची नियुक्ती अधिष्ठाता श्री.भाऊसाहेब हिरे शासकीय महाविद्यालय व रूग्णालय, धुळे यांच्या मार्फ़त करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### ब्रम्हपूरी (जि.चंद्रपूर) येथे ट्रामाकेअर युनिट मंजूर करण्याबाबत

**(१३) ८६७३२ (११-०८-२०१७). श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ब्रम्हपूरी (जि.चंद्रपूर) येथे ट्रामाकेअर युनिट सुरू करण्यासाठी जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रूग्णालय, चंद्रपूर यांनी प्रस्ताव (प्रस्ताव क्र. सारूच/नियोजन/टिसियु/ब्रम्हपूरी प्रस्ताव/८३७२/१६ दिनांक १८/४/२०१६ नुसार) तयार करून मंजूरी करीता उपसंचालक, आरोग्य विभाग, नागपूर यांच्याकडे पाठविले. उपसंचालक आरोग्य विभाग नागपूर यांनी प्रस्ताव क्र उसआसे/नियोजन/ट्राकेसे ब्रम्हपूरी/प्रस्ताव/१३६२८-२९/१६ दिंनाक २९ एप्रिल २०१६ नुसार सदर प्रस्तावास अंतिम मंजूरी मिळण्याकरीता संचालक आरोग्य सेवा आरोग्य भवन मुंबई यांच्याकडे पाठविण्यात आले असतानाही गेल्या दिड वर्षापासून सदर प्रस्ताव प्रलंबित असून अद्यापही प्रस्तावास मंजूरी देण्यात आली नसल्याची माहिती दिनांक १५ जून २०१७ रोजी वा त्या सुमारास निर्देशनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ब्रम्हपूरी येथे ट्रामा केअर युनिट मंजूर करण्याकरीता व प्राप्त झालेल्या प्रस्तावास मंजूरी मिळण्याकरीता लोकप्रतिनिधींनी निवेदनाव्दारे वारंवार मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रस्तावास तातडीने निधीसह प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०३-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) सन २०११ च्या जनगणनेवर आधारीत आरोग्य संस्थांचा जोड बृहत आराखडा तयार करण्यात येत असून चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपुरी येथे ट्रॉमा केअर युनिट सुरू करण्याची मागणी निकषानुसार जोड बृहत आराखड्यात समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील ग्रामीण भागात बोगस डॉक्टरांचा बेकायदेशीररित्या वैद्यकिय व्यवसाय सुरु असल्याबाबत**

**(१४) ८७३११ (१९-०८-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील ग्रामीण भागात बोगस डॉक्टरांचा बेकायदेशीररित्या वैद्यकिय व्यवसाय सुरु असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, अशा बोगस डॉक्टरांकडून रुग्ण दगावल्यास रुग्णांच्या नातेवाईकांशी मध्यस्थामार्फत तडजोड करीत प्रकरणी मिटवित असल्याने पोलिसांतही यासंदर्भात तक्रारी करण्यात येत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१४-०३-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद कोल्हापूर यांनी मे २०१७ मध्ये गावनिहाय बोगस डॉक्टर शोध मोहिम राबविणेत आली होती. त्यापैकी १२२ बोगस डॉक्टर आढळून आले.

(२) हे खरे नाही. परंतु तक्रारदारांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सन २०१७ मध्ये बोगस डॉक्टरांचे विरुध्द एकूण १० गुन्हे दाखल आहेत.

(३) ११८ इलेक्ट्रोपॅथी व्यवसाय करणारे खाजगी वैद्यकीय व्यवसाय करीत होते. त्यापैकी तालुकास्तरीय बोगस डॉक्टर शोध समितीमार्फत नोटीस दिल्यानंतर ८४ खाजगी वैद्यकीय व्यवसायीकांनी व्यवसाय बंद केले आहेत.

(४) सन २०१७ मध्ये बोगस डॉक्टरांवर एकूण १० गुन्हे दाखल असून सर्व गुन्हयांचे दोषारोपत्र मा.कोर्टामध्ये दाखल करण्यात आलेले आहेत आणि तालुकास्तरीय बोगस डॉक्टर शोध समिती मार्फत १८ डॉक्टर्सना नोटीसा देण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील बोगस फार्मसी नोंदणीबाबत**

**(१५) ९४९३४ (२४-१०-२०१७). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील केमिस्ट दुकानामध्ये फार्मासिस्ट म्हणून काम करण्यापूर्वी फार्मसी काऊन्सीलकडे नोंदणी करावी लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्नाटक राज्यातील पॅरामेडिकल काऊन्सीलचे बोगस प्रमाणपत्राच्या आधारे महाराष्ट्र राज्यात फार्मासिस्ट होत असल्याचे प्रकार दिनांक २२ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास यापूर्वीही बाहेरच्या राज्यातील बोगस प्रमाणपत्राद्वारे नोंदणी करण्याचा प्रकार निदर्शनास आलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणते धोरण निश्चित केले वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१६-०३-२०१९) :** (१) होय.

महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषदेकडून फार्मसी ॲक्ट १९४८ च्या कलम ३२(२) अंतर्गत तरतूदीनुसार फार्मसिस्ट नोंदणी प्रमाणपत्र जारी करण्यात येते.
(२) हे अंशत: खरे आहे.

माहे ऑगस्ट, २०१७ च्या सुमारास एका अर्जदाराचे कागदपत्र बनावट असल्याचे निदर्शनास आले.
(३) होय.

सन २०१३ पासून आजतागायत बनावट कागदपत्राआधारे पंजीकरण मिळविण्याचा प्रयत्न केल्याबाबत एकूण आठ व्यक्ती आढळून आल्या आहेत.
(४) बाहेरील राज्यात नोंदणीकृत औषध व्यवसायींनी महाराष्ट्रात पंजीकरण स्थानांतरण करुन मिळावे यासाठी अर्ज केल्यास संबंधित राज्य परिषदेने त्यांचेकडील पंजीकरण रद्द करुन ना हरकत प्रमाणपत्र दिल्यास संबंधित अर्जदारास महाराष्ट्रात राज्य औषध व्यवसाय परिषदेकडून पंजीकरण दिले जाते. संबंधित महाविद्यालय/विद्यापीठ/राज्य औषध व्यवसाय परिषद यांचेकडून पडताळणी दरम्यान बनावट कागदपत्रे असल्याचे आढळल्यास कार्यकारी समितीच्या आदेशानुसार गुन्हा दाखल करण्यात येतो.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासकीय रुग्णालयात व वैद्यकिय महाविद्यालयात स्वीय प्रपंची खात्यातील जमा निधीचा विनियोन करण्याबाबत**

**(१६) ९५०५८ (२७-१२-२०१७). श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शासकीय रुग्णालयात व वैद्यकिय महाविद्यालयात रुग्णांकडून व शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीकडून जमा करण्यात येणाऱ्या स्वीय प्रपंची निधीचा विनियोग करण्याबाबतच्या दिनांक २७ नोव्हेंबर, २००१ च्या शासन निर्णयाच्या मार्गदर्शक सुचनांमध्ये बदल करण्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्वीय प्रपंची खात्यातील रक्कम ही यंत्रसामुग्री वरील देखभाल व दुरूस्ती खर्च, प्रयोगशाळा व रक्तपेढी देखभाल दुरूस्ती, इमारत दुरूस्ती, शव वाहीनीवरील खर्च करण्याच्या सुचना शासन निर्णयात असून त्यामध्ये अजून रुग्णालयात लागणाऱ्या आधुनिक यंत्रसामुग्रीची खरेदी, रुग्णालयामध्ये लागणारे खाटा किंवा शासनाकडून ज्या कामासाठी निधी उपलब्ध होणे अडचणीचे होत असेल त्यागोष्टीं अश्या अनेक गोष्टींचा समावेश करण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासन सदर सुचनांच्याबाबत शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्यास सकारात्मक आहे काय,
(४) नसल्यास, सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०३-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

राष्ट्रीय आरोग्य अभियानामार्फ़त राज्यातील जैव वैद्यक यंत्र सामुग्री देखभाल दुरूस्तीसाठी मे.फ़ेबर सिंदुरी, चेन्नई यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांच्या मार्फ़त दि.०१.१२.२०१६ पासून वैद्यकीय उपकरणांची दुरूस्ती व देखभाल दुरूस्ती करण्यात येते. त्यामुळे रूग्णालयीन यंत्रसामुग्री दुरूस्ती वा देखभाल दुरूस्ती स्वीय प्रपंजी खात्यातून करण्यात येत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रामटेक, (जि.नागपूर) येथील उप जिल्हा रूग्णालय येथे ट्रामा सेंटर सुरु करण्याबाबत**

**(१७) ९८२९८ (२७-१२-२०१७). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रामटेक (जि.नागपूर) येथे उप जिल्हा रूग्णालय असून रामटेक हे तिर्थ व पर्यटन क्षेत्र असून येथे दररोज हजारो भाविक व पर्यटक ये-जा करिता असतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे येथे मोठया प्रमाणात रस्त्यावर वाहनांची ये-जा सुरू असल्याने नेहमीच अपघात होत असून अपघातग्रस्तांना तात्काळ उपचाराकरिता ४० ते ५० कि.मी. दुर असलेल्या नागपूर येथे जावे लागते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अपघात झालेल्या रूग्णांना उपचार मिळत नसल्याने रूग्ण मृत्यमुखी पडत असल्याने रामटेक येथे ट्रामा सेंटर सुरू करणे अत्यंत गरजेचे असून ते लवकरात लवकर सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०३-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) सन २०११ च्या जनगणनेवर आधारीत आरोग्य संस्थांचा आधारीत जोड-बृहत आराखडा तयार करण्यात येत असून उपजिल्हा रूग्णालय, रामटेक येथे ट्रामा केअर सेंटर सुरू करण्याची मागणी निकषानुसार जोड-बृहत आराखड्यात समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रायपुर, टाकळघाट, कान्होलीबारा अडेगांव (ता.हिंगणा, जि.नागपुर) येथील आरोग्य केंद्रामधील आरोग्य सुविधांबाबत आढळणाऱ्या त्रुटींची पुर्तता करणेबाबत

**(१८) १०११५९ (०४-०१-२०१८). श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायपुर, टाकळघाट, कान्होलीबारा अडेगांव (ता.हिंगणा, जि.नागपुर) येथील आरोग्य केंद्रामधील आरोग्य सुविधांच्या त्रुटीची पुर्तता करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १७ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आरोग्य केंद्रामध्ये अनेक महत्वाची पदे रिक्त आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आरोग्य केंद्रामध्ये रिक्त पदे भरण्यात आली आहे काय व या आरोग्य केंद्राची त्रुटीची पुर्तता करण्यात आली आहे काय

(४) नसल्यास आरोग्य केंद्राची त्रुटीची पुर्तता व रिक्त पदे भरण्याची कार्यवाही न करण्याची कारणे काय ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०३-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे

(३) रायपूर, टाकळघाट, कान्होलीबारा व अडेगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांमधील वैद्यकीय अधिकारी यांची प्रत्येकी दोन अशी एकूण ८ पदे भरण्यात आली आहेत. तसेच सदर प्राथमिक आरोग्य केंद्रांमधील अनुक्रमे १, ६, १ व ४ कर्मचा-यांची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही जिल्हा परिषद स्तरावर सुरू आहे. प्राथमिक आरोगय केंडात आवश्यक सुविधा उपलब्ध आहेत.

(४) गट-क व गट-ड या संवर्गातील भरतीयोग्य रिक्त पदे भरण्याची कार्यवाही ग्राम विकास विभागामार्फ़त सुरू आहे.

---

## गोदिया जिल्हयातील के टी एस. जिल्हा सामान्य रुग्णालयात डॉक्टरांच्या दिरंगाईमुळे रुग्णांचा झालेला मृत्यू

**(१९) १०१४९० (०३-०१-२०१८). श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिकलसेल रोगांसाठी शासनाकडून विविध सुविधा पुरविण्यात येतात परंतु गोंदिया जिल्हयात के टी एस. जिल्हा सामान्य रुग्णालयात डॉक्टरांच्या दिरंगाईमुळे एका २१ वर्षीय तरुणीचा मृत्यू झाल्याची घटना दिनांक १ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१६-०३-२०१९) :** (१) गोंदिया येथील के टी एस रुग्णालयात सिकलसेल पिडीत तरुणीचा दिनांक ०१/१०/२०१७ रोजी मृत्यु झाला आहे.

(२) सदर प्रकरणी संस्थास्तरावर गठित करण्यात आलेल्या समितीने चौकशी केली आहे.

(३) चौकशी समितीच्या अहवालानुसार रुग्णाचा मृत्यु Respiratory Arrest with sickle cell crises यामुळे झाला असल्याचे नमूद करण्यात आले आहे. दरम्यान कर्तव्यावरील डॉक्टर विनापरवानगी गैरहजर असल्याने रुग्णांची गैरसोय होत आहे अशी तक्रार रुग्णाच्या नातेवाईकांनी केल्याने अधिष्ठाता यांनी दिनांक ०१/१०/२०१७ अन्वये डॉ. पंकज गणवीर यांना निलंबित केले आहे.

(४) लागू नाही.

---

**राज्यातील रुग्णालयात ज्येष्ठ नागरिक व अपंग रुग्णांना वैद्यकीय सुविधा प्रधान्याने मिळण्याकरिता स्वतंत्र व्यवस्था करण्याबाबत**

**(२०) १०३५२९ (०६-०१-२०१८). श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ज्येष्ठ नागरिक व अपंग रुग्णांना शासकीय, महापालिका तसेच, जिल्हा/ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय तपासणीसाठी व डॉक्टरांनी दिलेली औषधे घेण्याकरिता रांगेमध्ये तासनतास उभे रहावे लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्येष्ठ नागरिक व अपंग रुग्णांकरिता शासकीय/निमशासकीय रुग्णालयात वैद्यकीय सुविधा प्रधान्याने मिळण्याच्या दृष्टीने स्वतंत्र व्यवस्था करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) जेष्ठ नागरीक व अपंग रूग्णांकरीता शासकीय / निम शासकीय रूग्णालयात तातडीने सेवा मिळण्यासाठी स्वतंत्र रांग व्यवस्था उपलब्ध करून देण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयातील डॉ. शंकरराव चव्हाण वैद्यकीय महाविद्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(२१) १०३५८० (२७-१२-२०१७). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील डॉ.शंकरराव चव्हाण वैद्यकीय महाविद्यालयात २०० खाटाचे रुग्णालयाचे ५०० खाटांचे करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रुग्णालयात वर्ग ४ चे २४६ पदांपैकी ५५ पदे रिक्त असल्यामुळे रुग्णालयात स्वच्छता विषयक कामे करण्यास पुरेसे कर्मचारी वर्ग नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अपुरे कर्मचाऱ्यामुळे रुग्णालयात मोठ्या प्रमाणात अस्वच्छता व घाणीमुळे डेंग्यू व मलेरिया सारख्या रोगाने रुग्णाचे जीव धोक्यात आले आहे, हे ही खरे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने रुग्णालय परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी रिक्त कर्मचाऱ्यांची पदे भरण्याबाबत किंवा बाह्यस्तोत्रामार्फत कामे करुन घेण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१६-०३-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) सदर संस्थेस वर्ग ४ ची एकूण २४६ पदे मंजूर असून त्यामधील ६७ पदे रिक्त आहेत.रिक्त असलेल्या पदांवर २९ दिवस तत्वावर बदली कर्मचारी कार्यरत आहेत.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) सदर संस्थेतील रुग्णालय परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी शासनाने प्राधिकृत केलेल्या दोन संस्थांकडून बाह्यस्त्रोतामार्फत स्वच्छता विषयक काम करण्यासाठी मनुष्यबळ उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही संस्थास्तरावर सुरु आहे.
(६) लागू नाही.

---

## गडचिरोली जिल्हयातील जिल्हा सामान्य रुग्णालयात नविन सीटीस्कॅन मशिनचा पुरवठा करण्याबाबत

**(२२) १०४९४५ (३१-०३-२०१८). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्हयातील जिल्हा सामान्य रुग्णालयातील सीटीस्कॅन मशिन गेल्या एक वर्षापासून नादुरुस्त असल्यामुळे रुग्णांना तपासणी करण्यासाठी बाहेर खाजगी रुग्णालय तसेच चंद्रपूर येथे जावे लागत असल्यामुळे जादा रक्कम खर्च करावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रुग्णांची समस्या सोडविण्यासाठी सध्या बंद असलेली सिटी स्कॅन मशिन निर्लेखित करून नविन सिटी स्कॅन मशिन त्वरीत उपलब्ध करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्यापही उक्त प्रकरणी कोणतीच कार्यवाही होत नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०३-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

जिल्हा रुग्णालय, गडचिरोली येथील सी.टी.स्कॅन मशीन दि. २८.०६.२०१६ रोजी बंद पडली आहे. तथापि, रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून बी.पी.एल.धारक रुग्णांचे व तातडीचे सी.टी.स्कॅन हे खाजगी व्यावसायिकांमार्फत काढण्यात येतात व त्यांची देयके रुग्ण कल्याण समिती अथवा स्वीय प्रपंजी खात्यामधून भागविण्यात येत आहे.

(२) नादुरुस्त असलेले सी.टी.स्कॅन मशीन निर्लेखित करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच दि.१५.०९.२०१७ च्या शासन निर्णय अन्वये ३१ सी.टी.स्कॅन खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळांचे मार्फत ई-निविदा प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदरहू निविदा प्रक्रिया अंतिम करून ३१ रूग्णालयांकरीता सी.टी.स्कॅन मशीन पुरविण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## धुळे (जि.धुळे) शहरात मंजूर झालेले नवीन जिल्हा रुग्णालय कार्यान्वित करण्याबाबत

**(२३) १०५७७३ (०१-०४-२०१८). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे (जि.धुळे) शहरात मंजूर झालेले नवीन जिल्हा रुग्णालय कार्यान्वित करुन रुग्णांची होत असलेली गैरसोय दूर करावी अशी मागणी जिल्ह्यातील सामाजिक संघटनांसह नागरीकांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान धरणे आंदोलनाद्वारे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील नविन जिल्हा रुग्णालयाचा प्रश्न त्वरीत मार्गी लावण्याचे आश्वासन मा.पालकमंत्री यांनी दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील मंजूर जिल्हा रुग्णालय कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०३-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) जिल्हा रूग्णालय, धुळे येथे बाह्य रूग्ण विभाग व २० खाटांचे आंतर रूग्ण विभाग सुरू करण्यात आला आहे. सदर इमारतीच्या स्ट्रक्चरल ऑडिट नुसार दुरूस्ती अंदाजपत्रक व आराखड्यांना रू.२,०५,९३,६२१/- एवढ्या अनुदानास दि.२६.०२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मंजूरी देण्यात आली आहे. तसेच दि.१०.०५.२०१८ च्या शासन निर्णयान्वये विद्युत विभागाच्या दुरूस्ती नकाशे व अंदाजपत्रकास रू.९५,४२,४९६/- इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर इमारतीच्या दुरूस्तीचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील आयुर्वेद व होमिओपॅथी महाविद्यालयांमध्ये पुरेसे अध्यापक व सुविधा नसल्याबाबत**

**(२४) १०६७२५ (०७-०४-२०१८). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.विजय भांबळे (जिंतूर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.संजय कदम (दापोली), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आयुर्वेद व होमिओपॅथी महाविद्यालयांमध्ये पुरेसे अध्यापक तसेच पायाभूत सुविधा नसल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत पुरेस अध्यापक तसेच पायाभूत सुविधा नसल्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, राज्यातील आयुर्वेद व होमिओपॅथी महाविद्यालयांमध्ये अध्यापक व पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१६-०३-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) शासनाने दिनांक ९.१०.२०१७ च्या परिपत्रकान्वये आयुर्वेद व होमिओपॅथी महाविद्यालयांचे परिणामात्मक मुल्यांकन करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

---

**सांगली येथील सिव्हील रुग्णालयाच्या दुरवस्थेबाबत**

**(२५) १०७७९३ (३१-०३-२०१८). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली येथील सामान्य रुग्णालयात सुधार समितीने केलेल्या पाहणीत रुग्णालयाच्या आवारात दारुच्या बाटल्या आढळून आल्याची बाब माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, गेल्या ४ महिन्यांपासून इंजेक्शनच्या सुईसह आवश्यक वैद्यकीय साहित्य व काही औषधे उपलब्ध नसल्यामुळे रुग्णांची गैरसोय होत असून त्यांना नाहक आर्थिक भार सहन करावे लागत असल्याचे दिनांक १० जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत दोषी असणाया संबंधितांवर कारवाई करण्यासोबतच येथे रुग्णांसाठी आवश्यक वैदयकीय साहित्य व औषधे तातडीने उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१६-०३-२०१९) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) लागू नाही.

---

**नेवासा (जि.अहमदनगर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या स्थलांतराबाबत**

**(२६) १०७९०४ (३१-०३-२०१८). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेवासा (जि.अहमदनगर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्र शहरातून स्थलांतरीत करण्यात येऊ नये याबाबतची मागणी नगराध्यक्ष यांनी जिल्हा परिषदेकडे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीनुसार शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, त्यांचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०३-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) नेवासा येथे ग्रामीण रुग्णालय कार्यान्वित असल्याने व महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रातील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र इतरत्र स्थलांतर करण्याबाबत धोरण असल्याने प्राथमिक आरोग्य केंद्र त्याच तालुक्यातील ग्रामीण भागात स्थलांतर करण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर स्तारावर बनविण्यात येत आहे

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती येथील जिल्हा स्त्री रुग्णालयात रुग्णांची होत असलेली गैरसोय**

**(२७) १०८१०० (३१-०३-२०१८). डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.मोहन फड (पाथरी), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथील जिल्हा स्त्री रुग्णालयात उद्‌भवणाऱ्या विविध समस्या तातडीने दूर करण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक १३ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयात उद्वाहन, रक्तपेढी उपलब्ध नसून तसेच अपुरा कर्मचाऱ्यामुळे रुग्णांची गैरसोय होत असल्याचे लोकप्रतिनिधींनी निवेदनात नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०३-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) जिल्हा स्त्री रूग्णालय, अमरावती येथील नवीन उद्वाहनाचे काम प्रगतीपथावर आहे. सद्यस्थितीत रक्त साठवणी केंद्र कार्यरत असून रक्त संक्रमण अधिकारी व अन्य ३ रक्त पेढी तंत्रज्ञांची पदे व २ रक्तपेढी परीचर पदे भरली आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील बेकायदेशीर पॅथॉलॉजीवर बंद करण्यासह लॅबमध्ये होणा-या चाचण्याच्या शुल्कावर निर्बंध घालणेबाबत**

**(२८) १०९१७८ (०५-०४-२०१८). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.नारायण कुचे (बदनापूर), प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनधिकृतरित्या सुरु असलेल्या पॅथॉलॉजिस्ट लॅब तात्काळ बंद करावयात असे स्पष्ट आदेश मा.सर्वोच्च न्यायालयाने दिले असतानाही नांदेड शहर व परिसरात शेकडो बेकायदेशीर पॅथॉलॉजी लॅब सुरु असल्याचे दिनांक २१ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, राज्यात ३५०० पॅथॉलॉजीस्ट असून १०,००० पॅथॉलॉजी लॅब आहेत यामध्ये पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या व मेडीकल कौन्सिलला नोंदणीकृत असलेले पॅथॉलॉजिस्टच

लॅबोरेटरीचे रिपोर्ट प्रमाणित करून वैद्यकीय प्रयोगशाळेतील अहवालावर सही करण्याचा अधिकार असल्याचे माहे फेब्रुवारी २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विविध भागातील लॅबमधील चाचण्याच्या शुल्कावर शासनाचे व मेडीकल कौन्सिलचे कोणत्याही प्रकारचे निर्बंध नसल्यामुळे लॅबमधील डॉक्टर अधिक शुल्क आकारुन रूग्णांची तपासणी करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार बेकायदेशीर पॅथॉलॉजी लॅब तात्काळ बंद करुन दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासह राज्यातील पॅथॉलॉजी लॅबमध्ये होणा-या चाचण्याच्या शुल्कावर निर्बंध घालणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१४-०३-२०१९) :** (१) होय, हे अंशत: खरे असून अशा २२ बेकायदेशीर लॅब नांदेड महानगरपालिका क्षेत्रात असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

राज्यात पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या व मेडीकल कौन्सिलला नोंदणीकृत असलेल्या आणि लॅबोरटरी रिपोर्टवर सही करण्याचा अधिकार असलेल्या पॅथॉलॉजीस्टची संख्या २५४६ इतकी आहे.

(३) हे खरे नाही.

सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे दि. २८.०९.२०१६ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार जिल्हा शल्य चिकित्सक, नांदेड यांनी लॅबमधील तपासणी शुल्कासंदर्भात सर्व खाजगी पॅथॉलॉजी लॅब चालकांना दि. २७.११.२०१८ रोजी सूचना दिल्या आहेत.

(४) सार्वजनिक आरोग्य विभागाने दि. २८.०९.२०१६ रोजी खाजगी रुग्णालय/प्रयोगशाळा यांनी डेंगू निश्चित निदान चाचणीसाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्कावर नियंत्रण ठेवण्याकरिता शासन निर्णय निर्गमित केला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जांब (ता.मोहाडी, जि.भंडारा) येथे ग्रामीण रुग्णालय मंजूर करण्यास विलंब होत असल्याबाबत**

**(२९) १०९१८८ (०१-०४-२०१८). श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जांब (ता.मोहाडी, जि.भंडारा) येथे ग्रामीण रुग्णालय मंजूर करण्याकरिता स्थनिक लोकप्रतिनिधीनी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांना दिनांक ३ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले, हे खरे आहे काय

(२) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) सन २०११ च्या जनगणनेवर आधारीत आरोग्य संस्थांचा जोड बृहत आराखडा तयार करण्यात येत असून जांब येथे ग्रामीण रूग्णालय स्थापन करण्याची मागणी निकषानुसार जोड बृहत आराखड्यात समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चांदवड (जि.नाशिक) येथील उपजिल्हा रुग्णालयात ग्रामीण भागातून उपचार घेण्यासाठी आलेल्या रुग्णांची होत असलेली गैरसोय**

**(३०) १०९३२६ (३१-०३-२०१८). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदवड (जि.नाशिक) येथील रुग्णालयात ग्रामीण भागातून उपचार घेणा-या रुग्णांना आरोग्य सुविधा अपु-या मिळत असल्याने त्यांची गैरसोय होत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या उपजिल्हा रुग्णालयात ११२ गावांतील रुग्ण उपाचराकरीता येत असतात, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, औषधांचा तुटवडा, अपु-या सोयी सुविधा यामुळे रुग्णांना खाजगी रुग्णालयांमध्ये उपचार करुन घेण्याची वेळ येते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू उपजिल्हा रुग्णालय अद्यावत करून सर्व सोयीसुविधा रुग्णांना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) चांदवड शहर व शहराच्या आजुबाजूच्या गावातील रूग्ण उपचारासाठी उपजिल्हा रूग्णालय, चांदवड येथे औषधोपचारासाठी येतात.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्ह्यातील प्रस्तावीत महिला प्रसुतीगृह रुग्णालय सुरु करण्याबाबत**

**(३१) ११०१९८ (०४-०४-२०१८). श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यातील प्रस्तावीत महिला प्रसुतीगृह रुग्णालय सुरु करणेबाबत अद्यापपर्यंत शासनाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास याबाबत शासन स्तरावर काही उपाययोजना करण्यात आल्या वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) सन २००१ च्या बृहत आराखड्यानुसार मंजूर नवीन १०० खाटांच्या महिला व बाल रूग्णालयाच्या बांधकामाचे अंदाजपत्रक व आराखडे सादर करण्याबाबत कार्यकारी अभियंता यांच्याकडे कार्यवाही सुरू आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सोलापूर येथील छत्रपती शिवाजी महारात सर्वोपचार रुग्णालयातील आरोग्य सेवेचा दर वाढविण्याच्या निर्णयाबाबत**

**(३२) ११०९५५ (१०-०४-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर येथील छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुगणालयात शासनाने यंदाच्या वर्षापासून आरोग्य सेवेचा दर वाढविण्याचा निर्णय दिनांक ५ जानेवारी, २०१८ रोजी घेतला असल्याने जिल्हाधिकारी, सोलापूर येथे शासकीय रूग्णालयातील दरवाढीचा निषेध करणेसाठी विविध संघटनांनी मोर्चे काढल्याचे दिनांक ८ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केसपेपर, आहार, बेड, विविध चाचण्या इ. साठी शुल्क दुप्पट ते दिडपट केले असल्याने विविध संघटना मोर्चेकरी यांनी शासकीय रूग्णालयात शासनाने केसपेपर पासून सर्वच तपासण्या करण्याकरिता लागू केलेली दुप्पटीने दरवाढ तात्काळ रद्द करावी अशी मागणी जिल्हाधिकारी यांच्यासह श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रूग्णालय, सोलापूर येथील अधिष्ठाता यांच्याकडेही करण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ही शुल्कवाढ सर्वसामान्यांना परवडणारी नसल्यामुळे सदर मागणीनुसार शासकीय रुग्णालयातील वाढलेली शुल्कवाढ कमी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१६-०३-२०१९) :** (१) याबाबत जिल्हाधिकारी, सोलापूर यांना दिनांक ०९/०१/२०१८ चे संघटनेचे निवेदन प्राप्त झाले आहे.
(२) हे खरे आहे.
(३) सर्व शासकीय वैद्यकीय/दंत महाविद्यालय व संलग्नित रुग्णालयांमध्ये निरनिराळ्या चाचण्या व वैद्यकीय सुविधांकरिता नव्याने दर निश्चित केले आहेत. सदर रुग्णशुल्कांमध्ये दरवर्षी वाढ न करता आठ वर्षानंतर माफक दरवाढ करण्यात आली आहे. दारिद्रय रेषेखालील रुग्णांवर तसेच रु.१.५० लाख पेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेल्या रुग्णांवर महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेतंर्गत निशुल्क उपचार करण्यात येतात.
(४) लागू नाही.

---

**कोपरगाव (जि.अहमदनगर) येथील ग्रामीण रुग्णालयामधील रुग्णांची होत असलेली गैरसोय**

**(३३) ११३५२४ (०१-०४-२०१८). श्रीमती स्नेहलता कोल्हे (कोपरगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोपरगाव (जि.अहमदनगर) येथील ग्रामीण रुग्णालयामधील रुग्णांना आवश्यक सेवा सुविधा मिळत नसल्याचे माहे जानेवारी २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ग्रामीण रुग्णालयात अपुरे डॉक्टर, अपुरा औषधसाठा व स्वच्छतेच्या अभावी रुग्णालयात आलेल्या रुग्णांची व त्यांच्या नातेवाईकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत रुग्णालयातील आवश्यक त्या सेवा सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) सदर रूग्णालयातील वैद्यकीय अधिकारी गट अ चे मंजूर एक पद रिक्त असून वैद्यकीय अधिकारी गट- ब च्या मंजूर ३ पदांपैकी २ पदे भरलेले असून १ अस्थाई पद भरले आहे. जानेवारी, २०१८ दरम्यान औषधांचा काही प्रमाणात तुटवडा होता. तथापि स्थानिक खरेदीतून औषधांची निकड भागविण्यात आली होती तसेच स्वच्छतेसाठी कंत्राटी कर्मचारी कार्यरत असून त्यांच्याकडून नियमित स्वच्छता करून घेण्यात येते. त्यामुळे रूग्ण व त्यांचे नातेवाईक यांची गैरसोय होत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील शासकीय रुग्णालयात खाटांची संख्या वाढविण्याबाबत**

**(३४) ११६८६९ (०६-०८-२०१८). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागातील रुग्णालयात ४ हजार २६४ रुग्णांमागे केवळ एकच खाट तर शहरात एक लाख लोकांमागे केवळ १०८ खाटा असल्याची बाब माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जागतिक आरोग्य संघटनेच्या नियमात साधारणतः एक हजार रुग्णांमागे एक खाट असावी असे नमूद कले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संचालक,आरोग्य सेवा यांनी ग्रामीण भागातील रुग्णांना उत्तम वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देण्याकरिता शासन प्रयत्नशील असून जिल्हा रुग्णालयात आणि प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णांसाठी खाटांची सेवा असून ५० खाटांची सोय प्रत्येक रुग्णालयात असल्याचे सांगण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, आदिवासी भागामध्ये २० कि.मी अंतरावर तर गावखेड्यात ३० कि.मी. अंतरावर एक प्राथमिक आरोग्य उपकेंद्र उपलब्ध करुन देण्यात आल्याचे देखिल संचालक, आरोग्य सेवा यांनी सांगितले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार राज्यात रुग्णालयांमध्ये खाटांचे व सुविधांचे प्रमाण वाढविण्यासह आदिवासी भागातील व गावखेड्यातील उपकेंद्राचे अंतर कमी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०३-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र राज्यात १७९५ इतक्या ग्रामीण लोकसंख्येमागे १ खाट शासकीय रूग्णालयात उपलब्ध आहे.

राज्यात एकूण ग्रामीण व शहरी लोकसंख्येचा विचार करता २०८८ लोकसंख्येमागे एक खाट शासकीय रूग्णालयात उपलब्ध आहे.

(२) हे खरे आहे.
(३) हे अंशत: खरे आहे.

सर्व जिल्हा रूग्णालये व प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये खाटांची सोय आहे. उपजिल्हा रूग्णालयामध्ये ५०/१०० खाटांची सोय आहे.

(४) हे खरे नाही.

आदिवासी/डोंगराळ क्षेत्रामध्ये ३ हजार लोकसंख्येसाठी व प्रत्येक ४ कि.मी. अंतरावर एक उपकेंद्र आणि बिगर आदिवासी भागात ५ हजार लोकसंख्येसाठी प्रत्येक ६ कि.मी. अंतरावर एक उपकेंद्र असे निकष निश्चित करण्यात आले आहेत.

(५) सन २०११ च्या लोकसंख्येवर आधारीत आरोग्य संस्थांचा जोड-बृहत आराखडा तयार करण्याची कार्यवाही सुरू असून नवीन आरोग्य संस्थांना मान्यता देण्याची व जुन्या आरोग्य संस्थांचे श्रेणीवर्धन करण्याची मागणी निकषानुसार जोड बृहत आराखड्यामध्ये समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

**अहमदनगर जिल्हयातील जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्रासाठी जिल्हा रुग्णालयात जागा देण्याबाबत**

**(३५) ११८६२४ (२३-०७-२०१८). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.संग्राम थोपटे (भोर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयातील अपंगांसाठी (दिव्यांग) असलेले जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्राला मागील सहा वर्षापासून जिल्हा रुग्णालयात हक्काची जागा देण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या केंद्रासाठी जिल्हा रुग्णालयास जागा देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०३-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) अपंग पुनर्वसन केंद्राकरीता विखे पाटील फ़ाऊंडेशन (विळद घाट) येथे इमारत उपलब्ध करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उपजिल्हा रुग्णालय, मनमाड (ता.नांदगांव, जि.नाशिक) येथे ट्रामा केअर सेंटर सुरु करणेबाबत**

**(३६) ११८७५३ (२३-०७-२०१८). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उपजिल्हा रुग्णालय मनमाड (ता.नांदगांव, जि.नाशिक) येथे ट्रामा केअर सेंटर सुरु करणेबाबतची मागणी लेखी निवेदनाद्वारे स्थानिक लोकप्रतिनिधीं यांनी मा.सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री यांच्याकडे दिनांक २३ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपजिल्हा रुग्णालय मनमाड येथे ट्रामा केअर सेंटर सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०३-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) सन २०११ च्या जनगणनेवर आधारीत आरोग्य संस्थांचा जोड-बृहत आराखडा तयार करण्याचे काम सुरू असून उपजिल्हा रूग्णालय, मनमाड येथे ट्रॉमा केअर सेंटर सुरू करण्याची मागणी निकषानुसार जोड-बृहत आराखड्यात समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चांदुर रेल्वे, नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) तालुक्यातील ग्रामिण रुग्णालयातील गैरसोयी दूर करण्याबाबत

**(३७) ११८८४६ (२३-०७-२०१८). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.रणजीत कांबळे (देवळी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदुर रेल्वे, नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) तालुक्यातील ग्रामिण रुग्णालायच्या राष्ट्रीय आरोग्य देखरेख अभियाना अंतर्गत देखरेख समितिच्या दिनांक १ मे २०१८ रोजीच्या सभेत तालुक्यातील नागरीकांनी आरोग्य व रुग्णालयातील रिक्त पदे, अपुरा औषध साठा, एक्स रे मशिन बंद पडल्याबाबत तसेच स्वच्छतेसंदर्भात तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार सदर ग्रामिण रुग्णालयातील रिक्त पदे तसेच विविध समस्या सोडविण्यासाठी शासनाने कोणती कायवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही.

राष्ट्रीय आरोग्य देखरेख समितीकडे ग्रामीण रूग्णालय, चांदुर रेल्वे, जि.अमरावती बाबत तक्रार प्राप्त झालेली नाही.

(२) ग्रामीण रूग्णालय, चांदुर रेल्वे येथे एकूण २९ पदे मंजूर असून त्यापैकी २२ पदे भरलेली आहेत. वैद्यकीय अधिक्षक-१, दंत चिकित्सक-१, अधिपरिचारीका-२, औषध निर्माता-१, कनिष्ठ लिपिक-१, दंत चिकित्सक सहाय्य्क-१ ही ७ पदे रिक्त आहेत. रूग्णालयातील औषधांचा साठा उपलब्ध असतो. अपवादात्मक परीस्थितीत औषधे उपलब्ध नसल्यास रूग्णाच्या गरजेनुसार स्थानिक पातळीवर औषधी खरेदी करून रूग्णांना पुरविण्यात येतात. एक्स रे मशिन सुरळित चालू आहे. रूग्णालयातील दोन सफ़ाई कामगारांची पदे भरली असून त्यांच्याकडून रूग्णालयीन साफ़सफ़ाई, पोस्ट मार्टम रूमची इतर कामे करून घेण्यात येतात.

(३) रूग्णालयातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पांढरकवडा (जि.यवतमाळ) येथील शासकीय उपजिल्हा रुग्णालयात पाण्याअभावी रुग्णांची होत असलेली गैरसोय

**(३८) ११९१५८ (२३-०७-२०१८). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पांढरकवडा (जि.यवतमाळ) येथील शासकीय उपजिल्हा रुग्णालयात गेल्या काही दिवसांपासून पाणी नसल्यामुळे रुग्णांची गैरसोय होत असल्याची बाब माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाणी नसल्यामुळे सदर रुग्णालयातील स्वच्छतागृह अस्वच्छ झाले असल्याने प्रशासनाविषयी नागरिकांमधून संताप व्यक्त केला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या उपजिल्हा रुग्णालयात पाणीपुरवठा सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०३-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

बोअरवेल नादुरूस्त झाल्यामुळे दि. २२.०५.२०१८ रोजी रूग्णालयातील पाणी पुरवठा तात्पुरता बंद झालेला होता.

(२) हे खरे नाही.

(३) रूग्णालयातील बोअरवेल दुरूस्ती केल्यानंतर २४ तास नियमित पाणीपुरवठा दि.२३.०५.२०१८ रोजी सुरू करण्यात आला. बोअरवेल मोटार दुरूस्त होईपर्यंत रूग्णालयीन स्वच्छतेकरीता नगरपरिषदेकडून टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात आला होता.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वाशिम जिल्ह्यामध्ये जिल्हा शल्य चिकित्सक (सीएस) यांचे बनावट वैद्‌यकीय प्रमाणपत्र बनविणारी टोळी सक्रीय असल्याबाबत

**(३९) १२०५८१ (०१-०८-२०१८). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **वैद्‌यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यामध्ये जिल्हा शल्य चिकित्सक (सीएस) यांचे बनावट वैद्‌यकीय प्रमाणपत्र बनविणारी टोळी सक्रीय असल्याची बाब माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या अकोला विभागात सदर बनावट वैद्‌यकीय प्रमाणपत्रांचा सर्रास वापर होत असून प्रस्तुत प्रकरणातील दोषींविरुध्द कारवाई करण्याबाबतचे निवेदन अकोल्याच्या स्थानिक लोकप्रतिनिधींनी विभागीय नियंत्रकांना दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने दोषींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१४-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही. तथापि, वाशिम जिल्हयातील कारंजा आगार येथे नेमणूकीस असलेला स्वच्छक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ कारंजा आगार, जि.वाशिम याने जिल्हा शल्य चिकित्सक, वाशिम यांचे बनावट व खोटया सहीचे दि.८.३.२०१८ रोजीचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर केले.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

परंतु या प्रकरणातील आरोपीवर भादंवि कलम ४६८, ४७१ अन्वये पोलीस स्टेशन कारंजा शहर येथे दि.५.६.२०१८ रोजी गुन्हा दाखल केला असून दि.१३.१०.२०१८ रोजी सी.आर.पी.सी. कलम ४१(१) अन्वये समजपत्र देण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर जिल्हयात ट्रामाकेअर केंद्र सुरु करण्याबाबत**

**(४०) १२१०२२ (२३-०७-२०१८). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील रामटेक हे तीर्थक्षेत्र व पर्यटन क्षेत्र असून तेथे दररोज भाविक, पर्यटक व वाहनांची वर्दळ होत असल्याने अनेक छोटे-मोठे अपघाततही होत असल्याने या अपघातातील अपघातग्रस्तांना तातडीने उपचाराकरिता नागपूर येथे जावे लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर सार्वजनिक आरोग्य मंडळाअंतर्गत सहा जिल्हायामध्ये १४ ट्रामाकेअर युनिटला मंजुरी मिळूनही आठ ते दहा वर्षाचा कालावधी पूर्ण होऊनही केवळ ८ ट्रामाकेअर युनिट सुरु असल्याचे माहे मे, २०१८ च्या दुस-या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर जिल्हयात ट्रामा केअर सेंटर सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०३-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) ग्रामीण रूग्णालय, काटोल, उमरेड व भिवापूर येथे ट्रामा केअर मंजूर करण्यात आली असून ती कार्यान्वित करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### घोटी (जि.नाशिक) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयाची संरक्षक भिंतीचे दुरुस्तीचे काम करण्यात आले नसल्याबाबत

**(४१) १२१२६२ (२८-०७-२०१८). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घोटी (जि.नाशिक) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयाची संरक्षक भिंत दीड वर्षापूर्वी कोसळली असून त्यांच्या दुरुस्तीचे काम अद्यापही करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील संरक्षक भिंत तातडीने बांधण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०३-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नाशिक यांच्या दि. २२.०२.२०१८ च्या पत्रान्वये सदर संरक्षक भिंत दुरूस्तीसाठी रू.४०.०० लक्ष रकमेस प्रशासकीय मान्यता दिली असून सदरच्या कामाची निविदा प्रक्रिया सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पूर्ण करण्यात आली आहे व कार्यारंभ आदेश देण्याची प्रक्रिया सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### भारतीय वैद्यक परिषदेने (एमसीआय) विदर्भातील पाच शासकीय व खासगी संवर्गातील वैद्यकिय महाविद्यालयांतील कांही विषयाच्या पदव्युत्त्तर जागांना मान्यता नाकारण्यात आल्याबाबत

**(४२) १२२०६६ (०१-०८-२०१८). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतीय वैद्यक परिषदेने (एमसीआय) विदर्भातील पाच शासकीय व खासगी संवर्गातील वैद्यकिय महाविद्यालयांतील कांही विषयाच्या पदव्युत्त्तर जागांना मान्यता नाकारण्यात आली असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आवश्यक पायाभूत सुविधा व शिक्षकांची पदे भरण्याबाबत एमसीआयने केलेल्या सूचनांकडे दुर्लक्ष केल्यामुळे उक्त पाच महाविद्यालयांतील कांही विषयांच्या पदव्युत्त्तर जागा कमी करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निर्णयाचा जास्त परिणाम अकोला मेडिकल कॉलेजला होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, एमसीआयने केलेल्या निरिक्षणात अकोलातील शासकिय वैद्यकीय महाविद्यालयात एमआरआय तपासणी यंत्र नसणे, चार प्राध्यापक, सात सहयोगी प्राध्यापकांसह इतर कांही शिक्षकांची पदे रिक्त्त असणे, यासह अनेक त्रुटी आढळल्या तर

यवतमाळच्या वैद्यकीय महाविद्यालयातील एमआरआय उपकरण नसणे, सहा सहयोगी प्राध्यापकांसह १० सहायक प्राध्यापकांची पदे रिक्त असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(६) तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१४-०३-२०१९) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) नाही, हे खरे नाही.
(३) नाही, हे खरे नाही.
(४) होय, हे खरे आहे. रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) त्रुटी पूर्ततेबाबतची कार्यवाही सुरु आहे. त्यामुळे चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.
(६) अकोला व यवतमाळ येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात एम.आर.आय मशीन खरेदीस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे अध्यापक वर्गातील पदांबाबत सुध्दा कार्यवाही सुरु आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंजनगाव सुर्जी (ता.दर्यापूर, जि.अमरावती) येथील ग्रामीण रुग्णालयाचे रुपांतर उपजिल्हा रुग्णालयात करणेबाबत**

**(४३) १२५६७६ (२८-०७-२०१८). श्री.रमेश बुंदीले (दर्यापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंजनगाव सुर्जी (ता.दर्यापूर, जि.अमरावती) येथील ग्रामीण रुग्णालयाला आदिवासी भाग जोडलेला असून तेथे उपजिल्हा रुग्णालय नसल्यामुळे रुग्णाची गैरसोय होत असल्याने सदर ग्रामिण रुग्णालयाचे रुपांतर उपजिल्हा रुग्णालयात करण्याकरिता वारंवार संबधित विभागाकडे मागणी करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ग्रामीण रुग्णालय हे उपजिल्हा रुग्णालयात रुपांतरीत होण्याकरिता लागणा-या सर्वच निकषांत बसत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या ग्रामिण रुग्णालयातील वैद्यकिय अधिका-याची पदे देखिल रिक्त असल्याने रुग्णाची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर ग्रामिण रुग्णालयाचे रुपांतर उपजिल्हा रुग्णालयात करण्याच्या मागणीसंदर्भात व रिक्त पदे भरण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०३-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

सदर रूग्णालयाकरीता वैद्यकीय अधिकारी यांची ३ पदे मंजूर असून २ बंधपत्रित वैद्यकीय अधिका-याची पदे भरण्यात आली आहेत.

(४) अंजनगाव सुर्जी येथील ग्रामीण रूग्णालयाच्या ५० खाटांचे उपजिल्हा रूग्णालयात श्रेणीवर्धन करण्यास दि.१३.०७.२०१८ च्या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात आली आहे. तसेच रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### विरली (जि.गोंदिया) येथील आरोग्य उपकेद्राची झालेली दुरावस्था

**(४४) १२६३१९ (०१-०८-२०१८). श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विरली (जि.गोंदिया) येथील आरोग्य उपकेंद्र इमारतीचे विशेष दुरुस्तीचे कामास सन २०१७-१८ जिल्हा वार्षिक अंतर्गत निधी मंजूर झाला पण दुरुस्ती न झाल्याने इमारतीची दुरावस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार सदर इमारतीच्या दुरुस्ती करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०३-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

विरली हे उपकेंद्र भंडारा जिल्ह्यातील ता.लाखांदुर मधील आहे.

(२) व (३) सन २०१७-१८ मध्ये उपकेंद्र विरली (बु) येथील इमारत दुरूस्तीकरीता रू.४,९५,११०/-च्या कामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून सद्यस्थितीत सदर काम प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### नालासोपारा (जि.पालघर) तसेच मुंबईतील धारावी येथे बोगस डॉक्टरांना अटक करण्यात आल्याबाबत

**(४५) १२६९३१ (०७-१२-२०१८). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नालासोपारा (जि.पालघर) तसेच मुंबईतील धारावी येथे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान सहा बोगस डॉक्टरांना अटक करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांचेवर कोणत्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे,

(३) असल्यास, मुंबईतील धारावी व नालासोपारा येथीन अन्य डॉक्टारांची चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, बोगस डॉक्टरांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१४-०३-२०१९) :** (१) होय, अंशत: हे खरे आहे.

(२) आरोपींवर महाराष्ट्र वैद्यकीय व्यवसाय अधिनियम १९६१ चे कलम ३३, ३३(अ), ३८ या कलमान्वये गुन्हे दाखल केले आहेत.

(३) होय.

(४) मा.न्यायालयात ३ आरोपींवर दि.१६.१.२०१९ रोजी दोषारोप पत्र सादर केले आहे.

महाराष्ट्र वैद्यकीय व्यवसाय अधिनियम, १९६१ चे कलम ३३, ३३(अ), ३८, प्रमाणे गुन्हा दाखल केला असून २ आरोपींना अटक केली आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्यातर्फे धारावी येथील गिरीष चंद त्रिपाठी या एका बोगस डॉक्टरास कारणे दाखवा नोटीस देण्यात आली असून धारावी पोलीस स्टेशन येथे लेखी तक्रार देण्यात आली आहे. तसेच, श्री.रामचंद्र शुक्ला नावाच्या व्यक्तीच्या वैद्यकीय अर्हतेविषयी नोंदणी नसल्याबाबत धारावी पोलीस ठाण्यास पुढील कारवाई करण्याकरिता कळवले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील शासकीय रुग्णालयांमध्ये स्थानिक स्तरावर औषध खरेदीच्या मर्यादा वाढविण्याबाबत

**(४६) १२८१८१ (१०-१२-२०१८). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय रुग्णालयांमध्ये स्थानिक स्तरावर औषध खरेदीच्या मर्यादा पाच हजार रुपयांवरुन वाढवून १ लाख रुपयापर्यंत करण्याचा निर्णय माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान घेण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची औषध खरेदीची प्रक्रिया कशा प्रकारे असून औषधांचे दर करार निश्चित करण्यात आले आहेत काय,

(३) असल्यास, याबाबतची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१६-०३-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग शासन निर्णय दिनांक ०२/११/२०१८ अन्वये शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयांना औषधे व शल्योपचार सामुग्रीच्या खरेदीसाठी स्थानिक पातळीवरील स्पॉट खरेदीची मर्यादा रु.५०००/- वरुन रु.१०००००/- प्रतिदिन इतकी वाढविण्यास अटी व शर्तीच्या अधीन राहून मंजूरी देण्यात आलेली आहे. सदर खरेदीसाठी आवश्यक दरकरार नमूद करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कान्हुर पठार (ता.पारनेर, जि.अहमदनगर) या खेडेगावात बोगस डॉक्टरांविरुध्द कारवाई करण्याच्या मागणीसंदर्भात**

**(४७) १३०५२१ (११-१२-२०१८). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कान्हुर पठार (ता.पारनेर, जि.अहमदनगर) या खेडेगावात राहणा-या मेजर बाबा विजय ठुबे तसेच इतर बोगस डॉक्टरांवर गर्भलिंगनिदान प्रतिबंधक कायद्याअंतर्गत कठोर कारवाई करण्याची मागणी सर्वस्तरावरुन होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार दोषी आढळून येणा-या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१४-०३-२०१९) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

अहमदनगर जिल्हयातील पारनेर तालुक्यात सदर घटना निदर्शनास आली असून, बोगस डॉक्टरांकडून जादुटोणा सारखे प्रकार करुन लोकांची फसवणूक केली जात आहे.

(२) महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी परिषद यांच्यातर्फे श्री.बबनराव सिताराम ठुबे यांच्यावर कार्यवाही करण्याचे पत्र पोलीस निरीक्षक पारनेर जि.अहमदनगर यांना पाठविण्यात आले.

(३) सदर प्रकरणात भा.द.वि. क्र. ४२० महाराष्ट्र जादुटोणा विरोधी कायद्याच्या कलम २(२), २(१०), ३(२) अन्वये पारनेर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्हयात बोगस डॉक्टर वैद्यकीय व्यवसाय करीत असल्याबाबत**

**(४८) १३०७४४ (१०-१२-२०१८). श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील विविध भागात बोगस डॉक्टर वैद्यकीय व्यवसाय करीत असल्याचे दिनांक ०४ सप्टेबर, २०१८ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बोगस डॉक्टरांकडे कोणीतीही शैक्षणिक पात्रता नसतानाही त्यांनी दवाखाने सुरु केले असुन त्यांच्याकडे ॲलोपथी उपचाराचे कोणतेही ज्ञान नसतांना रुग्णावर उपचार करीत असल्याने रुग्णांचा जीवाला धोका निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार चंद्रपूर जिल्हयातील बोगस डॉक्टरांवर कारवाई करण्यासह भविष्यात असे प्रकार घडू नयेत म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१४-०३-२०१९) :** (१) होय, सन २०१८ पासून आजपावेतो चंद्रपूर जिल्हयामध्ये ६ बोगस डॉक्टर व्यवसाय करीत असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ च्या कलम ३३ अंतर्गत ६ बोगस डॉक्टरांविरुध्द गुन्हे दाखल केले आहेत.

(४) शासन निर्णय क्र. सीआयए १०९९/प्र.क्र.३५५/९/अधिनियम, दि.७ फेब्रुवारी, २००० नुसार बोगस वैद्यकीय व्यावसायिकांविरुध्द कारवाई करण्यासाठी जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्यातर्फे संबंधित पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदवली जाते. त्यानुसार पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांच्यातर्फे चौकशी करुन बोगस डॉक्टरांविरुध्द कार्यवाही केली जाते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वसई (जि.पालघर) येथे वैद्यकीय महाविद्यालयाच्या मागणीबाबत**

**(४९) १३१६२७ (०७-१२-२०१८). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) येथे वैद्यकीय महाविद्यालय काढण्यात यावे अशी मागणी शासनाकडे करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने वसई येथे वैद्यकीय महाविद्यालय काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१६-०३-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.
पालघर जिल्हयात नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याबाबत निवेदन प्राप्त झाले आहे.
(२) वसई (जि.पालघर) येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याची बाब तूर्त शासनाच्या विचाराधीन नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जऊळका (जि.वाशिम) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात शवविच्छेदन गृहात सुविधा नसल्याबाबत**

**(५०) १३३३८३ (१०-१२-२०१८). श्री.अमित झनक (रिसोड), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जऊळका (जि.वाशिम) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात शवविच्छेदन गृहात सुविधा नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अपघात अथवा इतर गंभीर घटनांमध्ये मृत्यू झालेल्या मृतदेहाचे शवविच्छेदनाची प्रक्रिया पार पाडण्यासाठी मृतदेहास मालेगाव अथवा वाशिम येथील शासकीय रुग्णालयात न्यावे लागत असल्याने मृतांच्या नातेवाईकांना अनेक अडचणींना समोरे जावे लागते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नागरीकांच्या सोयीसाठी शासनाने या प्राथमिक आरोग्य केंद्रात शवविच्छेदनगृहाची सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०३-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.

(३) वाशिक जिल्हा परिषदेंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र, जऊळकासह अन्य ६ प्राथमिक आरोग्य केद्रांच्या ठिकाणी शवविच्छेदन गृह बांधकाम जिल्हा वार्षिक योजना व जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजना मधून सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षाच्या प्रारूप आराखड्यात प्रस्तावित केले आहे. त्यानुसार सन २०१९- २०२० या आर्थिक वर्षात निधी प्राप्त झाल्यानंतर नवीन बांधकाम करण्याचे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.